# वसई-विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.११/१०/२०२४

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयुष्मान आरोग्य मंदिर व वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे लोकार्पण**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये १५ वा वित्त आयोगाअंतर्गत महानगरपालिकेमार्फत ५५ आयुष्मान आरोग्य मंदिर व राज्य शासनाने १५ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्याचे लक्ष्य दिलेले आहे.

दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी ०७ आयुष्मान आरोग्य मंदिर व ०१ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांचे स्थानिक लोकप्रतिनिधी, मान्यवर नागरिक व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत आतापर्यंत एकूण २६ आयुष्मान आरोग्य मंदिर व १५ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना नागरिकांना वैद्यकीय सुविधा देणेसाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेला दिलेल्या लक्ष्यापैकी आतापर्यंत १५ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करणेचे लक्ष्य महानगरपालिकेने पूर्ण केले असून उर्वरित आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करण्याचे लक्ष्य लवकरच महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात येईल.

दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी लोकार्पण करण्यात आलेली आयुष्मान आरोग्य मंदिर व वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ची ठिकाणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना,<br>वेदांत टॉवर, आंबावाडी रोड, तुळींज, नालासोपारा (पूर्व) |
| २. | आयुष्मान आरोग्य मंदिर, जे.पी.नगर, विरार (पश्चिम) |
| ३. | आयुष्मान आरोग्य मंदिर, प्रगतीनगर, नालासोपारा (पूर्व) |
| ४. | आयुष्मान आरोग्य मंदिर, कोशिंबे समाज मंदिर, विरार (पूर्व) |
| ५. | आयुष्मान आरोग्य मंदिर, बेलीचा पाडा, सातिवली, वसई (पूर्व) |
| ६. | आयुष्मान आरोग्य मंदिर, चिंचोटी, सानिया स्टुडीओ जवळ, कामण रोड, वसई (पूर्व) |
| ७. | आयुष्मान आरोग्य मंदिर, साई गार्डन, दिवाणमान, वसई (पश्चिम) |
| ८. | आयुष्मान आरोग्य मंदिर, उमेळा, नायगाव (पश्चिम) |

तरी शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील नजीकच्या आयुष्मान आरोग्य मंदिर व वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**